सोमवार दि. २२ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## एम.पी. डी. ए. व मोक्का गुन्ह्यातील फरार कुरव्यात गुन्हेगार पप्पु घोरपडे गुजरातमधून जेरबंद

### वापी येथे लपून बसलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे घेतले ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील एम पी डी ए आणि मोक्का अंतर्गत कारवाई झालेला कुख्यात गुन्हेगार पप्पु कचरु घोरपडे यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुजरात राज्यातील वापी येथून जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेला पप्पु घोरपडे हा पोलीस कारवाईपासून बचाव करण्यासाठी स्वतः चे अस्तित्व लपवून विविध ठिकाणी वास्तव्य करत होता. मात्र, गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

जिल्ह्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने आरोपीचा शोध सुरू केला होता.

**अस्तित्व लपवून राहत होता आरोपी**

पोलीस तपासादरम्यान आरोपी पप्पु घोरपडे हा वारंवार आपले ठिकाण बदलत असल्याचे निष्पन्न झाले. तो मोबाईलचा मर्यादित वापर करीत असल्याने तसेच स्वतःची ओळख लपवून राहत असल्याने त्याचा माग काढणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत होते.




स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त बातमीदारांची मदत, तांत्रिक माहितीचे विश्लेषण आणि विविध राज्यांमधील हालचालींची पडताळणी केल्यानंतर आरोपी गुजरात राज्यातील वलसाड जिल्ह्यातील वापी येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तात्काळ गुजरातकडे रवाना झाले. पथकाने सापळा रचून १९ जून २०२६ रोजी वापी येथून आरोपी पप्पु घोरपडे यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला जालना येथे आणण्यात आले असून २० जून रोजी पुढील कारवाईसाठी बदनापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

**मोक्का गुन्ह्यात होता फरार**

छत्रपती संभाजीनगर येथील श्रीधर नागनाथ कस्तुरे यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा क्रमांक २०२/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२) अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात आरोपी पप्पु घोरपडे आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणात पप्पु घोरपडे हा फरार होता.

**एम पी डी ए अंतर्गतही झाली होती कारवाई**

सन २०२५ मध्ये आरोपी पप्पु घोरपडे हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी आणि सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र धोकादायक कारवाया प्रतिबंधक कायदा () अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही तो पोलिसांपासून बचाव करण्यासाठी लपून राहत होता.

**बंदुकीचा धाक दाखवून जबरी चोरी**

दरम्यान, १३ जून २०२६ रोजी मध्यरात्री दावलवाडी परिसरात घडलेल्या जबरी चोरीच्या प्रकरणातही आरोपी पप्पु घोरपडेचे नाव समोर आले आहे. फिर्यादी अंकुश निवृत्ती बोचरे (रा. शेलुद चारठी, छत्रपती संभाजीनगर) हे जेसीबी ऑपरेटर असून, त्यांना बंदुकीचा धाक दाखवून त्यांच्या खिशातील २६ हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून घेण्यात आले होते. या प्रकरणी बदनापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३०/२०२६ अन्वये भारतीय (पान २ वर)

## यशवाडी दुर्घटनेतील जखमी प्रवीण राजबिंडे व दादाराव भांगे यांची आ. लोणीकर यांनी घेतली भेट

**जालना - प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील यशवाडी येथील श्री त्रिमूर्ती मारुती मंदिरात झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत जखमी झालेल्या श्रीधर जावळा येथील प्रवीण प्रकाश राजबिंडे आणि दादाराव भांगे यांची भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना येथील श्री सर्जिकल हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी प्रवीण राजबिंडे आणि दादाराव भांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांना धीर दिला. यशवाडी येथील मंदिराच्या बांधकामाधीन भागाचा काही हिस्सा कोसळल्याने झालेल्या दुर्घटनेत अनेक भाविक जखमी झाले असून विविध रुग्णालयांत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यापैकी गंभीर (पान २ वर)

## जालना शहरातील वाढत्या गुन्हेगारीचा मुद्दा अधिवेशनात मांडण्याची मागणी; जिल्ह्यातील आमदारांना निवेदन

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; सर्व पक्षीय आमदारांनी एकत्र येऊन शासनाकडे विशेष उपाययोजनांची मागणी करावी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात गेल्या काही महिन्यांपासून वाढत चाललेल्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक बनत असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी जिल्ह्यातील आमदारांना निवेदन देऊन हा गंभीर प्रश्न राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित करण्याची मागणी केली आहे.

मुंबई येथे २२ जूनपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जालना शहरातील वाढत्या गुन्हेगारीचा मुद्दा प्रभावीपणे मांडावा, गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाईसाठी शासनाकडे विशेष मागणी करावी तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्याची विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर, बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे, परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर तसेच भोकरदन विधानसभा मतदारसंघाचे आमदार संतोष दानवे यांना देण्यात आले आहे.

**वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जालना शहरात गेल्या काही महिन्यांत मारहाण, घरात घुसून हल्ले, दगडफेक, जबरी हल्ले तसेच पत्रकारांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील काही भागांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, त्याचा थेट परिणाम सामाजिक शांतता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर होत आहे.

**लक्ष्मीनारायणपुरा येथील घटनेचा उल्लेख**

निवेदनात प्रभाग क्रमांक ९ मधील (पान २ वर)

## जेईएस महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

### उद्योजक घनश्यामसेठ गोयल यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व

**जालना । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जालना येथील जेईएस महाविद्यालय परिसरात सकाळी सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शहरातील प्रख्यात व्यापारी व उद्योजक घनश्यामसेठ गोयल यांनी उपस्थिती लावून योगाभ्यासात सहभाग घेतला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, उद्योग क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती देखील आरोग्य आणि योगाला प्राधान्य देत असल्याचा सकारात्मक संदेश समाजात गेला.



सकाळच्या प्रसन्न वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात योगासन, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. उपस्थितांनी सामूहिकरित्या योगाभ्यास करत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

विशेष म्हणजे, शहरातील नामवंत उद्योजक घनश्यामसेठ गोयल यांनी योग कार्यक्रमात सहभागी होत आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रातील व्यस्त दिनचर्येमध्येही आरोग्यासाठी वेळ देणे किती आवश्यक आहे, याचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला.

आजच्या धकाधकीच्या जीवनात तणाव, मानसिक दबाव आणि विविध आरोग्य समस्यांमध्ये वाढ होत असताना योग ही प्रभावी जीवनपद्धती ठरत आहे. अशा परिस्थितीत उद्योग (पान २ वर)

## जालना जिल्हा क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### सामूहिक योग प्रात्यक्षिकास योगप्रेमींचा उस्फुर्त प्रतिसाद

**जालना -प्रतिनिधी**

पंतप्रधानांच्या पुढाकारातून २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने २१ जून हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ म्हणून घोषित केल्यानंतर जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यानिमित्त जालना जिल्ह्यातही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा प्रशासन, जिल्हास्तर योग समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा परिषद जालना, क्रीडा भारती, जिल्हा




योग संघटना, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, विविध योग संस्था, जिल्हा स्काऊट अँड गाईड तसेच जिल्हा एकविध क्रीडा संघटना आणि विविध क्रीडा मंडळांच्या संयुक्त विद्यमाने आज जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामूहिक योग शिबिर व योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या योग कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष दादासाहेब भुतेकर, डॉ. प्रकाश आंबेकर, क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापक सचिन पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, जिल्हा सल्लागार आयुष विभाग डॉ. कुलदिप वाघपंजर, मिलिंद तायडे, श्रीमती सोनिया सिरसाठ, जिल्हा संघटक स्काऊट व गाईड, जालना, विजय गाडेकर, विनोद चोबे, क्रीडा (पान २ वर)

## तीन दिवसांपासून बेपत्ता तरुणाचा शेतात मृतदेह

### *संशयास्पद मृत्यूची चौकशी करण्याची मागणी

### *नातेवाईकांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**जालना -प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाडेगव्हाण येथे तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका ३४ वर्षीय तरुणाचा मृतदेह शेतशिवारात आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. कैलास गुलाब गिरी असे मृत तरुणाचे नाव असून, त्यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करत नातेवाईकांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे जाफराबाद तालुक्यात संतापाची लाट पसरली असून, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर नातेवाईकांनी धरणे आंदोलनही सुरू केले. मिळालेल्या माहितीनुसार, गाडेगव्हाण येथील कैलास गिरी हे मागील तीन दिवसांपासून घरातून बेपत्ता होते. नातेवाईकांनी आणि



कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र त्यांचा कुठलाही ठावठिकाणा लागत नसल्याने त्यांच्या पत्नी ज्योती कैलास गिरी यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, शोधमोहीम सुरू असतानाच शुक्रवारी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास गावाजवळील एका शेतशिवारात कैलास गिरी यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह प्रथम जाफराबाद ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला.

मात्र, मृत्यूबाबत संशय व्यक्त करत नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्याची मागणी केली. त्यानुसार शनिवारी सकाळी मृतदेह जालना जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला असून पुढील वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

मृत कैलास गिरी यांच्या पत्नी ज्योती गिरी यांनी आपल्या पतीचा मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप केला असून, या प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, कैलास गिरी यांचा मृत्यू नैसर्गिक नसून त्यामागे घातपात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणात टेंभुर्णी पोलिसांकडून ‘‘पीएम रिपोर्ट आल्यानंतर पाहू, छोट्या-मोठ्या गोष्टी होत राहतात‘‘ असे वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या कथित वक्तव्यामुळे संतापाची भावना निर्माण झाली असून, मृताच्या कुटुंबीयांनी आणि स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, या प्रकरणाचे वार्तांकन करणारे पत्रकार सुनील भारती यांना गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याचाही आरोप आंदोलकांकडून करण्यात आला आहे. या आरोपांमुळे प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे.

**जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन**

घटनेच्या निषेधार्थ नातेवाईक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी जालना येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी पंकज जाधव यांनी आंदोलकांना आश्वस्त करत, ‘‘कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर (पान २ वर)

## ताली योगाद्वारे आरोग्याचा संदेश



**जालना - प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अग्रशक्ती बहू मंडळ, जालना आणि इनर व्हील क्लब ऑफ जालना होरायझन यांच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल अमित येथे ‘‘ताली योगा ‘‘ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात सुमारे १०० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योग प्रशिक्षिका स्वाती भरवाडा व त्यांच्या सहकारी टीमने ताली योगा, प्राणायाम व विविध योगासनांचे मार्गदर्शन केले. ताली योगाच्या माध्यमातून आरोग्य, सकारात्मकता आणि आनंदाचा अनोखा अनुभव सहभागी महिलांनी घेतला. ताली योगाचे महत्त्व व त्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घेत उपस्थितांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. विशेष म्हणजे, सर्वांसाठी निःशुल्क आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. योग सत्रानंतर सर्व सहभागी महिलांना ई-प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी सर्वांनी नियमित योग व प्राणायाम आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अग्रशक्ती बहू मंडळाच्या अध्यक्षा सौ. नेहा शिरीष अग्रवाल, सचिव सौ. रुची अर्पण गोयल, कोषाध्यक्षा सौ. श्वेता सिद्धांत (पान २ वर)

# संपादकीय....

## वाहतुकीचा वेढा आणि प्रशासनाची परीक्षा

शनी मंदिर चौक ते एस.बी. हायस्कूल मार्गावरील वाढती कोंडी ही केवळ वाहतुकीची नव्हे तर नियोजनाच्या अपयशाची घंटा जालना शहरातील शनी मंदिर चौक ते एस.बी. हायस्कूल हा रस्ता आज केवळ एक वाहतूक मार्ग राहिलेला नाही, तर शहरातील वाढत्या अनियोजनाचा आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचा एक जिवंत दस्तऐवज बनला आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या, अवजड वाहनांची सर्रास वर्दळ, बेकायदेशीर पार्किंग आणि अपुरी वाहतूक यंत्रणा यामुळे हा मार्ग नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, ज्या मार्गावर अवजड वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध आहेत, त्याच मार्गावर मोठ्या वाहनांची नियमित ये-जा होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. जर नो-एंट्रीचे नियम केवळ फलकांपुरते मर्यादित राहणार असतील, तर वाहतूक व्यवस्थेच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. एस.बी. हायस्कूल परिसर हा विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असलेला भाग आहे. शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा ठिकाणी अवजड वाहनांची उपस्थिती ही संभाव्य अपघातांना निमंत्रण देणारी बाब ठरू शकते. कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक आहे. याचबरोबर बेकायदेशीर पार्किंग ही शहरातील वाहतूक व्यवस्थेची मोठी समस्या बनली आहे. रस्त्याच्या दुतर्फा उभी राहणारी वाहने रस्त्याची रुंदी कमी करतात आणि वाहतुकीचा वेग मंदावतात. परिणामी, काही मिनिटांचा प्रवास अनेकदा दीर्घकाळाच्या प्रतीक्षेत बदलतो. या समस्येकडे केवळ तात्पुरत्या कारवायांच्या माध्यमातून पाहून चालणार नाही. प्रशासन, वाहतूक विभाग आणि महानगरपालिका यांनी संयुक्तपणे या भागासाठी दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. नो-एंट्री नियमांची कठोर अंमलबजावणी, नियमित वाहतूक पोलिसांची नियुक्ती, बेकायदेशीर पार्किंगविरोधात सातत्यपूर्ण मोहीम, सीसीटीव्ही निरीक्षण आणि पर्यायी पार्किंग व्यवस्था यासारख्या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे. शहरांच्या विकासाचा मापदंड केवळ नवीन रस्ते किंवा इमारती नसतात, तर नागरिकांना सुरक्षित, सुरळीत आणि शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे असते. जालना शहरातील या भागातील परिस्थिती प्रशासनासाठी एक इशारा आहे. जर वेळेत उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात ही समस्या अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकते. नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न हे केवळ तक्रारी नाहीत, तर शहराच्या भविष्यासंदर्भातील चिंता आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने पाहून तातडीने ठोस पावले उचलणे ही काळाची गरज आहे.


दैनिक युवा आदर्श दि. २२-०६-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My
Old Name
Shaikh Kalim Shaikhnayyum
To New Name
Kalim Nayyum Shaikh
Amir Complex, Mehebub Nagar,
Ghansawangi, Jalna. 431209


# सावजींचे पत्र-व्यवस्थेवर तीव्र चपराक




माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी मुख्य सचिवांना लिहिलेले पत्र केवळ एक शासकीय कागद नसून, ती महाराष्ट्रातील सुस्तावलेल्या प्रशासकीय व्यवस्थेवर मारलेली तीव्र चपराक आहे. अन्न व औषध प्रशासनाचे () आयुक्त आय.ए.एस तुकाराम मुंढे यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करण्यासाठी सावजी यांनी वापरलेली उपरोधिक भाषा आज संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा आणि चिंतनाचा विषय बनली आहे.

महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना पाठवलेले पत्र सध्या संपूर्ण राज्यात आणि सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आहे. आपल्या धडाकेबाज आणि कडक कार्यशैलीसाठी प्रसिद्ध असलेले आय.ए.एस अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन () विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कामाचे कौतुक करण्यासाठी सावजी यांनी हे पत्र लिहिले आहे.या पत्राचा मुख्य विषय आणि त्याअनुषंगाने निर्माण झालेल्या जनतेच्या भावना देखील आहेत.

सुबोध सावजी यांचे मुख्य सचिवांना दिलेले पत्र अजब आणि उपरोधिक मागणीचे आहे. तुकाराम मुंढे यांच्या,भेसळखोरा विरुद्ध, गुटखा विक्री, साठवणूक, वाहतूक विरुद्ध धडक कारवायांमुळे राज्यातील भ्रष्टाचारी आणि भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे इतर अधिकाऱ्यांमध्येही अशीच कर्तव्यदक्षता निर्माण व्हावी, यासाठी ''तुकाराम मुंढे यांचे एक बाटली रक्त काढून ते राज्याच्या मुख्य सचिवांसह सर्व खातेप्रमुखांना थोडे-थोडे देण्यात यावे'', अशी उपहासात्मक मागणी सावजी यांनी पत्रात केली आहे.रक्त संक्रमणाचा तर्क सिद्धांत मांडला आहे. ज्याप्रमाणे एखाद्या अशक्त रुग्णाला सशक्त व्यक्तीचे रक्त देऊन बरे केले जाते, त्याचप्रमाणे तुकाराम मुंढे यांचे रक्त दिल्यास राज्यातील इतर खातेप्रमुखांनाही प्रामाणिकपणे आणि वेगाने काम करण्याची प्रेरणा व शक्ती मिळेल, असा तर्क त्यांनी मांडला आहे.

प्रशासकीय संथपणावर ताशेरे ओढले आहे. तुकाराम मुंढे ज्या जिद्दीने कायद्याची अंमलबजावणी करत आहेत, तसे काम इतर विभागांमध्ये होताना दिसत नाही, अशी खंत त्यांनी या पत्राद्वारे व्यक्त केली आहे. या पत्राच्या अनुषंगाने जनतेच्या मनातील भावनासुबोध सावजी यांचे हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर जनतेकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया उमटत आहेत. सामान्य नागरिकांच्या मनात या विषयावर संमिश्र आणि तीव्र भावना आहेत. तुकाराम मुंढे यांच्या कामाचे भरभरून कौतुक आणि पाठिंबा कारवाईचे सर्वत्र स्वागत होत आहे. तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच अवघ्या काही दिवसांतच भेसळ करणाऱ्यांवर आणि अवैध धंदेवाल्यांवर केलेल्या मोठ्या कारवायांमुळे जनता अत्यंत समाधानी आहे.अधिकारी असावा तर असा.अशा प्रतिक्रिया उमटत आहे. सामान्य माणूस रोज शासकीय कार्यालयांमध्ये चकरा मारून, टेबलखालचे पैसे देऊन थकला आहे. अशा वेळी जेव्हा तुकाराम मुंढे यांच्यासारखा अधिकारी सर्वसामान्यांसाठी धावून जातो, तेव्हा जनता त्यांच्या पाठीशी उभी राहते. सावजी यांनी पत्रात नेमकी हीच भावना मांडली आहे की, सामान्य माणसाला भ्रष्ट व्यवस्थेपासून वाचवण्यासाठी तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची देशाला आणि राज्याला गरज आहे.

हा सामान्य माणूस केवळ एक करदाता किंवा मतदार नसून, तो या संपूर्ण लोकशाहीचा खरा मालक आहे, ज्याला केवळ सन्मानाने आणि प्रामाणिकपणे काम करून हवे असते.

जनतेच्या मनात मुंढे यांच्याविषयी प्रचंड आदर असून, ''प्रशासकीय व्यवस्था सुधारण्यासाठी पद मोठे असण्यापेक्षा नियत मोठी असावी लागते'', अशा भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

विद्यमान प्रशासकीय व्यवस्थेबद्दल तीव्र संताप तर इतर अधिकाऱ्यांविषयी नाराजी व्यक्त होत आहे. सावजींच्या पत्रातील उपरोधाला दाद देत, अनेक नागरिकांनी सोशल मीडियावर कमेंट्स केल्या आहेत की, ''बाकीच्या अधिकाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा शिल्लक नसल्यामुळेच अशी मागणी करण्याची वेळ आली आहे''.''

हे काम आधी का झाले नाही?'': सर्वसामान्य जनतेचे आरोग्य आणि पैशांशी खेळणाऱ्या माफियांची साखळी मोडून काढणारे मुंढे हे एकमेव अधिकारी का दिसतात? इतर अधिकारी काय करत होते? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे. तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीची भीती राजकीय दबावाची चिंताही व्यक्त केली जात आहे. तुकाराम मुंढे यांच्या कारवाया मंत्र्यांपर्यंत किंवा बड्या नेत्यांपर्यंत पोहोचू लागल्या की त्यांची तडकाफडकी बदली केली जाते, असा जुना अनुभव आहे. त्यामुळे याही वेळी सरकार त्यांच्यावर राजकीय दबावातून बदलीची कारवाई करेल का, अशी भीती जनतेला सतावत आहे.बदली झाल्यास आंदोलनाचा इशाराही काही तरुण शेतकरी आणि जागरूक नागरिकांनी दिला आहे. उघडपणे म्हटले आहे की, जर प्रामाणिकपणे काम करणाऱ्या या अधिकाऱ्याची पुन्हा बदली झाली, तर आम्ही मंत्रालयासमोर आंदोलन किंवा तीव्र निषेध नोंदवू.



सावजी यांच्या अनोख्या शैलीची चर्चा होत आहे. सुबोध सावजी बुलढाणा विदर्भातील जेष्ठ नेते आहेत. ते नेहमीच त्यांच्या आक्रमक आणि वादग्रस्त विधानांसाठी ओळखले जातात. मात्र, या पत्रातील त्यांची उपहासात्मक शैली जनतेला भावली आहे. थेट रक्ताची मागणी करून त्यांनी प्रशासनाच्या अशक्त आणि संथ कारभारावर अचूक बोट ठेवल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

महसूल विभाग, सहकार विभाग,तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, कृषी विभाग, उत्पादन शुल्क विभाग,.. अशा अनेक विभागात तुकाराम मुंढे यांचे सारखे अधिकारी असावे असे विचार सामान्य जनता व्यक्त करू लागली आहे. थोडक्यात सांगायचे तर, सुबोध सावजी यांच्या या पत्राने महाराष्ट्रातील प्रशासकीय सुस्ती आणि भ्रष्टाचाराविरुद्ध जनतेच्या मनात असलेल्या सुप्त असंतोषाला वाचा फोडली आहे..

महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात अनेक पत्रे लिहिली जातात, वादळ उठवतात आणि विरून जातात. परंतु, माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलेले पत्र याला अपवाद ठरले आहे. या पत्राने शासकीय यंत्रणेच्या ढिसाळपणावर असा काही सर्जिकल स्ट्राईक केला आहे, ज्याची हाक दीर्घकाळ ऐकू येत राहील.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# पान १ व ४ वरुन...

### एम.पी. डी. ए....

न्याय संहितेच्या कलम ३०९(६) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातही पप्पु घोरपडे याचा सहभाग असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, इरशाद पटेल, रमेश काळे, धीरज भोसले आणि सोपान क्षीरसागर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

**जिल्ह्यातील गुन्हेगारांमध्ये खळबळ**

मोक्का आणि एम पी डी ए अंतर्गत कारवाई झालेला आरोपी गुजरातमधून जेरबंद झाल्यामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेला या कारवाईमुळे मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

### यशवाडी दुर्घटनेतील...

जखमी झालेले प्रवीण प्रकाश राजबिंडे आणि दादाराव भांगे यांच्यावर जालना येथील श्री सर्जिकल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. आमदार बबनराव लोणीकर यांनी रुग्णालयात भेट देऊन डॉक्टर राजन उढाण यांच्याकडून प्रवीण राजबिंडे आणि दादाराव भांगे यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती घेतली. उपचारांबाबत आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी डॉक्टरांशी चर्चा केली. तसेच जखमी प्रवीण राजबिंडे आणि दादाराव भांगे व त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना मानसिक आधार दिला. यावेळी आमदार लोणीकर यांनी यशवाडी दुर्घटनेतील सर्व जखमी भाविकांना शासनाच्या वतीने आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. तसेच जखमींच्या उपचारात कोणतीही कमतरता राहू दिली जाणार नसून प्रशासन आणि आरोग्य यंत्रणेशी सातत्याने संपर्क ठेवला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुर्घटनेत जखमी झालेल्या सर्व भाविकांच्या लवकर प्रकृतीत सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना व्यक्त करत आमदार लोणीकर यांनी जखमींच्या कुटुंबीयांना धीर दिला आणि शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असा विश्वास दिला. या प्रसंगी धनंजय पोहेकर डॉक्टर राजेंण उडान यांची उपस्थिती होती.

### जालना शहरातील...

लक्ष्मीनारायणपुरा परिसरातील एका गंभीर घटनेचा उल्लेख करण्यात आला आहे. किशोर कांबळे यांना १० ते १५ जणांच्या टोळक्याने घरात घुसून बेदम मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय पत्रकार राहुल मुळे यांना घाणेवाडी येथील वॉटर पार्क परिसरात मारहाण करून एका खोलीत डांबून ठेवल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. पत्रकारांवरील अशा कथित हल्ल्यांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि पत्रकारांच्या सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे.

दत्तनगर परिसरातील सिंधी कॉलनी येथे मोटानी यांच्या घरावर दगडफेक करून काही नागरिकांना जखमी करण्यात आल्याची घटनाही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. अशा घटनांमुळे शहरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असल्याचे सांगण्यात आले.

मुंबई येथे सुरू होणाऱ्या अधिवेशनात जालना शहरातील गुन्हेगारीची परिस्थिती सभागृहात मांडावी, गुन्हेगारांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईसाठी शासनाने विशेष धोरण आखावे तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी अतिरिक्त उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

या निवेदनाद्वारे जालना जिल्ह्यातील सर्व आमदारांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर एकत्रितपणे आवाज उठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे, संतोष कुरील, शरद मांगदरे, विलास तिकांडे, बाळासाहेब काळे, महेश नागवे, अनिकेत शिवरकर तसेच सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी दिले आहे.

**नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

जालना शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आगामी अधिवेशनात लोकप्रतिनिधी या विषयावर कोणती भूमिका घेतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### जेईएस महाविद्यालयात...

आणि व्यवसाय क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती योगसाधनेत सहभागी होत असल्याने सर्वसामान्य नागरिक, युवक आणि व्यापारी वर्गामध्येही योगाबाबत जागरूकता निर्माण होत आहे.

कार्यक्रमादरम्यान योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक लाभ याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर तंदुरुस्त राहते, मन शांत होते, एकाग्रता वाढते तसेच तणावमुक्त जीवन जगण्यास मदत मिळते, असे यावेळी सांगण्यात आले. घनश्यामसेठ गोयल यांच्या उपस्थितीमुळे योग हा केवळ एखाद्या विशिष्ट वर्गापुरता मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकासाठी आवश्यक असल्याचा संदेश अधोरेखित झाला. यामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी निरोगी आणि सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे आवाहन करण्यात आले.

व्यवसाय, उद्योग आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, याचे उदाहरण घनश्यामसेठ गोयल यांच्या उपस्थितीतून दिसून आले. त्यांच्या सहभागामुळे तरुण उद्योजक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांनाही योगाकडे वळण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### जालना जिल्हा...

संघटक, युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था व विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून योग दिनाची सुरूवात करण्यात आली. तदनंतर योगगुरू मनोज लोणकर, श्रीमती रिषीता नाथानी , प्रणव किनगावर, सहाय्यक योग शिक्षक यांनी प्रत्यक्ष योगा प्रात्यक्षिकांना सुरूवात केली. प्रमुख पाहुण्यांसह सर्व उपस्थितांनी योग प्रात्यक्षिके सामुहिकरित्या केली. यावेळी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालनाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सिध्दार्थ कदम यांनी केले. यावेळी शहरातील विविध अधिकारी कर्मचारी, विविध क्रीडा संघटनेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक, शासकीय नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी, ऑक्सफर्ड हायस्कुल, संस्कार प्रबोधिनी विद्यालय, जालना व जि.प.निवासी क्रीडा प्रबोधिनी, जालना येथील स्काऊट व गाईड पथक मुले व मुली सह, खेलो इंडिया खो-खो प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, क्रीडा प्रेमी, क्रीडा संघटक, युवक युवती यांच्यासह मोठया संख्येने योगार्थी उपस्थित होते. या कार्याक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शनाखाली सिध्दार्थ कदम, राज्य क्रीडा मार्गदर्शक, श्रीमती लता लोंढे, क्रीडा अधिकारी श्रीमती आरती चिल्लारे संतोष प्रसाद, वरिष्ठ लिपीक अमोल मुसळे, कनिष्ठ लिपीक राहुल राठोड,राहुल गायके, जयपाल राठोड , हारूण खान, भानुदास लांडगे, विजय कांबळे, श्रीमती.लताबाई लांडगे, श्रीमती. सिंधु लांडगे आदिनी परिश्रम घेऊन यशस्वीपणे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यास सहकार्य केले.

### तीन दिवसांपासून...

योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल,'' असे सांगितले. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असले तरी, या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणावे, तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईक आणि ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे जाफराबाद तालुक्यातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, आता सर्वांचे लक्ष शवविच्छेदन अहवाल आणि पुढील पोलिस तपासाकडे लागले आहे.

### ताली योगाद्वारे...

तवरावाला, उपाध्यक्षा सौ. नेहा विशाल गुप्ता, सहसचिव सौ. पायल करण अग्रवाल, माजी अध्यक्षा () सौ. रीता राम अग्रवाल, मार्गदर्शक सौ. सपना प्रमेन्द्र अग्रवाल व सौ. स्मिता राजेश पित्ती, तसेच प्रकल्प प्रमुख सौ. लक्ष्मी अग्रवाल व सौ. मेघा बगडिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच इनर व्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्षा सुचिता बगडिया, सचिव वैष्णवी मिसाळ, कोषाध्यक्षा सीमा गेही, उपाध्यक्षा पिंकी लड्डा, सहसचिव मयुरी मालपानी, तसेच प्रकल्प प्रमुख अश्विनी धन्नावत, पूनम अग्रवाल, पूजा तवरावाला व शिखा अग्रवाल यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

### अल निनोच्या...

उपस्थित करत त्यांनी दोन्ही विभाग एकाच मंत्र्यांकडे सोपविण्याची मागणी केली. यामुळे आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात अधिक सुसूत्रता आणि समन्वय निर्माण होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

**अधिवेशनात दुष्काळावर विशेष चर्चा व्हावी**

राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता अधिवेशनात दुष्काळ, पर्जन्यमानातील तूट, शेतकरी मदत, पीकविमा आणि आपत्ती व्यवस्थापन यावर किमान तीन दिवस विशेष चर्चा घेण्यात यावी, अशी मागणीही डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे. दुष्काळ आणि अतिवृष्टी या दोन्ही संकटांचा विचार करून राज्य सरकारने तातडीने दीर्घकालीन आणि प्रभावी नियोजन करावे, अन्यथा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात, असेही डॉ. लाखे पाटील यांनी सांगीतले आहे.

### सिद्धार्थ महाविद्यालयात...

झाले होते. योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे आरोग्याबाबत जनजागृती होण्यास मदत झाली. ''नियमित योग केल्याने ताण-तणाव दूर होऊन एकाग्रता वाढते,'' असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. पी. जगतवाड यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक योगसाधना व निरोगी जीवनाचा संकल्प करून करण्यात आला.

### रिसोड येथे...

डॉ. ज्ञानेश्वर सदार पाटील, डॉ. अरुण देशमुख, संजय सदार, गजानन पोपळघट, जुनघरे सर, सौ. अंजली धुमाळ, सौ. ज्योती खरबळ, सौ. ज्योती इंगोले, सौ. वंदना काळे, सौ. रेणुका काळेगावकर यांच्यासह आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातील अनेक सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ''योग करा आणि निरोगी रहा'' हा संदेश देत उपस्थितांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. योगाच्या माध्यमातून निरोगी, तणावमुक्त आणि आनंदी समाज निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

### बलात्कारासारख्या...

पोलीस ठाण्यांना पाठवण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे भविष्यात तिच्याकडून कोणतीही तक्रार आल्यास पोलिसांनी सावधगिरी बाळगावी. तसेच, तिच्याकडून कोणतीही नवीन तक्रार मिळाल्यास, एफआयआर नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देशही सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहेत. हे निर्देश कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेल्या अशाच एका निर्देशानुसार आहेत. या निकालामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (बलात्कार), कलम ३५४ (विनयभंग) आणि कलम ३५४अ (लैंगिक छळ) या तरतुदींचा गैरवापर करणाऱ्यांवर चाप बसेल अशी अपेक्षा आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ मध्ये कलम ६४ (बलात्कार), कलम ७४ (विनयभंग) आणि कलम ७५ (लैंगिक छळ) यांसारख्या तरतुदींमध्ये महिलांना अधिक संरक्षण देण्याचा आणि गुन्हेगारांना कठोर शक्षिा सुनिश्चित करण्याचा उद्देश आहे. मात्र, खोट्या तक्रारींमुळे न्यायव्यवस्थेवर ताण येतो आणि खऱ्या पीडितांना न्याय मिळण्यास विलंब होतो. ''या निकालपत्रातून आपल्याला हे शिकायला मिळते की, कायद्याचा गैरवापर करून कोणालाही त्रास देणे हे गंभीर परिणाम घडवून आणू शकते. विशेषतः बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये खोट्या तक्रारी दाखल करणे हे केवळ निरपराध व्यक्तींना त्रास देत नाही,

# मानवत तालुक्यातील यशवाडी येथील हनुमान मंदिराचा सभामंडप कोसळला

## धार्मिक कार्यक्रमादरम्यान घडली दुर्घटना; अनेक भाविक जखमी, युद्धपातळीवर मदत व बचावकार्य सुरू



**मानवत (परभणी) । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरात शनिवारी धार्मिक कार्यक्रम सुरू असताना सभामंडप अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या घटनेमुळे मंदिर परिसरात एकच खळबळ उडाली असून अनेक भाविक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मंडपाखाली काही भाविक अडकल्याचीही भीती व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम आणि दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी अचानक सभामंडपाचा काही भाग कोसळल्याने उपस्थितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही क्षणांतच परिसरात आरडाओरड आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन, महसूल विभाग, आरोग्य विभागाचे कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मंडपाखाली अडकलेल्या भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या मदतकार्यात सक्रिय सहभाग घेत ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. जखमींना तातडीने प्राथमिक उपचार देऊन जवळील रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे.

**मंदिर परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण**

दुर्घटनेनंतर मंदिर परिसरात काही काळ गोंधळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भाविकांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. प्रशासनाने तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत बचावकार्यावर भर दिला.

**दुर्घटनेचे कारण अद्याप अस्पष्ट**

सभामंडप कोसळण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मंडपाची संरचनात्मक स्थिती, बांधकामाची गुणवत्ता किंवा इतर कोणत्या कारणामुळे ही दुर्घटना घडली याची चौकशी संबंधित विभागांकडून सुरू करण्यात आली आहे.

अधिकृत तपास अहवालानंतरच दुर्घटनेमागील कारण स्पष्ट होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

**प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष**

घटनास्थळी वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. जखमींना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी यासाठी प्रशासनाने आवश्यक व्यवस्था केली आहे. जखमींची अचूक संख्या, मंडपाखाली अडकलेल्या व्यक्तींची स्थिती तसेच इतर तपशील प्रशासनाकडून अधिकृत माहिती प्राप्त झाल्यानंतर स्पष्ट होणार आहेत.

दरम्यान, या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जालन्यातील उघड्या मॅनहोल्सविरोधात मानवाधिकार आयोगात याचिका; आयएएस दर्जाचे आयुक्त असूनही जालनेकरांचे मरण सुटेना!

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरात गेल्या काही महिन्यांपासून उघडे आणि असमान पातळीवर असलेले मॅनहोल्स सर्वसामान्य नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत होऊन मोठा कालावधी उलटला, तसेच शहराला आयएएस दर्जाचे आयुक्त लाभले, तरीही जालनेकरांच्या नशिबातील नरकयातना आणि समस्यांचे दुष्टचक्र थांबलेले नाही. महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून आणि सातत्याने पाठपुरावा करूनही या जीवघेण्या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. अखेर प्रशासनाच्या या अकार्यक्षमतेमुळे संतप्त झालेले जालन्यातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत यांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली असून, मुंबई येथे रीतसर याचिका दाखल केल्याने पालिका वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे



शहराचे महापालिकेत रूपांतर झाल्यामुळे जालन्याचा कायापालट होईल आणि नागरी सुविधांचा दर्जा सुधारेल, अशी भाबडी आशा जालनेकरांना होती. मात्र, नाव मोठे आणि लक्षण खोटे अशीच काहीशी परिस्थिती सध्या शहरात पाहायला मिळत आहे. महापालिकेचा कारभार एका वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्याच्या हाती असतानाही मूलभूत समस्या सोडवण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. शहरातील विविध मुख्य रस्ते आणि अंतर्गत गल्ल्यांमध्ये मॅनहोल्सचे कव्हर्स गायब आहेत किंवा अत्यंत धोकादायक अवस्थेत तुटलेले आहेत . महापालिकेकडून भुयारी गटारांच्या स्वच्छतेचे काम अर्धवट सोडण्यात आल्याने रस्त्यांवर मृत्यूचे सापळे तयार झाले आहेत . पावसाळा तोंडावर असल्याने हे उघडे मॅनहोल्स पाण्याच्या प्रवाहात अदृश्य होतील, ज्यामुळे पादचारी आणि वाहनधारकांचा जीव जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या याचिकेमध्ये ॲड. धन्नावत यांनी एका अत्यंत गंभीर आणि धक्कादायक घटनेचा पुरावा म्हणून उल्लेख केला आहे. काही दिवसांपूर्वी कालिकुर्ती भागातील त्यांच्या घराजवळ अचानक भीषण आग लागली होती . मात्र, रस्त्यावरील असमान आणि अत्यंत खराब मॅनहोलमुळे अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळापर्यंत वेळेत पोहोचूच शकली नाही . सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली असली, तरी प्रशासनाच्या अशा ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास निष्पाप नागरिकांच्या मृत्यूला जबाबदार कोण, असा संतप्त आणि टोकदार सवाल या याचिकेद्वारे उपस्थित करण्यात आला आहे. या संपूर्ण कायदेशीर लढ्यावर आपली आक्रमक भूमिका मांडताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''सुरक्षित आणि निरोगी पर्यावरणात जगणे हा संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे जालना शहराचा दर्जा बदलला, पालिका गेली आणि महापालिका आली, आयएएस अधिकारी आयुक्त म्हणून आले; पण जालनेकरांची सुरक्षा मात्र वाऱ्यावरच आहे. आम्ही प्रशासनाला जागे करण्यासाठी अनेकदा लेखी व तोंडी विनंत्या केल्या, पण त्यांच्या सुस्त कारभारात कोणताही बदल झाला नाही. म्हणूनच नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी मला थेट मानवाधिकार आयोगाचे दरवाजे ठोठवावे लागले आहेत. या प्रकरणात दोषी असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यावर कडक शिस्तभंगविषयक कारवाई झालीच पाहिजे. ॲड. धन्नावत यांनी दाखल केलेल्या या याचिकेत मानवाधिकार आयोगाकडे अत्यंत महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, जालना शहरात सुरू असलेल्या पावसाळ्यापूर्वी सर्व उघडे मॅनहोल्स युद्धपातळीवर बंद करण्याचे आदेश तात्काळ महानगरपालिकेला द्यावेत . तसेच, या गंभीर निष्काळजीपणासाठी आणि कर्तव्यात कसूर केल्याबद्दल संबंधित अभियंत्यांची व अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची शिफारस करावी . भविष्यात अशा मॅनहोल्समुळे दुर्घटना घडल्यास पालिकेने पीडितांना योग्य भरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे . या कायदेशीर लढ्यात ॲड. अश्विनी महेश धन्नावत या कोर्टात बाजू मांडत आहेत

ॲड. महेश धन्नावत यांनी जालन्याच्या जनतेसाठी घेतलेल्या या धाडसी पवित्र्यामुळे त्रस्त नागरिकांमध्ये आता न्यायाची नवी आशा पल्लवित झाली आहे. गेल्या पाच महिन्यांपासून सतत भीतीच्या छायेत जगणाऱ्या जनतेला आता मानवाधिकार आयोगाच्या चाबकानंतर तरी न्याय मिळेल, अशी ठाम खात्री वाटत आहे . या याचिकेनंतर तरी आयएएस आयुक्तांचे प्रशासन खडबडून जागे होणार का, की केवळ कागदी घोडे नाचवले जाणार, याकडे आता संपूर्ण जालनेकरांचे डोळे लागले आहेत.

# खाकीचा अचूक डाव; जुगार अड्डा उद्‌ध्वस्त..!

## ७ जण ताब्यात;लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त



**भोकरदन - प्रतिनिधी**

भोकरदन प्रतिनिधी : अवैध धंद्यांविरोधातील मोहिमेला वेग देत भोकरदन पोलिसांनी शहरातील एका जुगार अड्ड्यावर धडक कारवाई करत सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम व सहा मोटारसायकलींसह तब्बल १ लाख ६४ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवनकुमार राजपूत व त्यांच्या पथकाने २० जून रोजी भोकरदन-सिल्लोड रोडवरील एका फर्निचर दुकानाच्या मागील मोकळ्या जागेवर छापा टाकला. यावेळी जुगार खेळत असलेल्या सात जणांना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी पंचासमक्ष पंचनामा करून रोख रक्कम व सहा मोटारसायकली जप्त केल्या.या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये सात आरोपींविरुद्ध भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचा इशारा..भोकरदन शहर व परिसरातील अवैध धंद्यांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, अशा कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत या धाडसी कारवाईतून मिळाले आहेत. शहरात सुरू असलेल्या अवैध प्रकारांमध्ये सहभागी असणाऱ्यांचे धाबे दणाणले असून पोलिसांच्या या ‘ॲक्शन मोड’ची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

या पथकाची उल्लेखनीय कामगिरी..ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर व पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवनकुमार राजपूत, पोलीस अंमलदार किशोर मोरे, गणेश पिपळकर, अर्जुन टेकाळे, प्रदीप टेकाळे तसेच होमगार्ड साजेद शेख यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# वाचकांचे मनोगत करिता

महाराष्ट्रात २००० सालापर्यंत ९ महानगरपालिका होत्या ,आता हा आकडा ३५ झाला.आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका म्हणून मुंबई महानगरपालिका आपले नावलौकिक ठेवून साजेसे नागरी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.मुंबई महानगरपालिका ब्रिटिश पूर्व काळातील आहे.१५३ वर्षात मुंबईची लोकसंख्या १ कोटी ४० लाख आहे.नागरिकांच्या मूलभूत आणि पायाभूत सुविधा देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेते.भूमिगत जलवाहिन्यांचे जाळे,मल:निसारण वाहिन्यांचे जाळे हाताळण्सयासाठी सक्षम यंत्रणा कार्यान्वित आहे.या दोन्ही यंत्रणांचे देशभरात कौतुक केले जाते.घन कचरा संकलन आणि निर्मुलन दररोज साडेआठ हजार मेट्रीक टन ओला सुका कचरा उचलला जात आहे.ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातून १५० मैल दूर वरून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.भांडुप जलाशय येथे पाण्याचे शुद्धीकरण करून मुंबईकरांना वितरीत करण्यात येते.पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी मोठे नाले , मध्यम नाले,छोटी गटारे यांचे नियोजन.लोकसंख्येच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरण आणि बांधकाम.वाढती वाहने , वाहतूक बेटे , स्वच्छता हे सर्व नाविन्यपूर्ण उपक्रम वर्षानुवर्षे चालत आलेले आहेत.मुंबई महानगरपालिका आठ भाषांमध्ये मोफत शिक्षण देते.मोठी रुग्णालये देशातील नावाजलेल्या रुग्णालयात त्यांचा समावेश होतो.(के इ एम,नायर,सायन ) पालिकेचे ९२ हजार कामगार - कर्मचारी - अधिकारी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सेवा पुरवतात.२९ कामगार संघटना कार्यरत आहेत.२२७ नगरसेवक मुंबई महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी आहेत.महाराष्ट्रातील विविध श्रेणीतील महानगरपालिकांनी किमान वर्षातून एकदाच नागरी सेवा सुविधांबाबत अधिकृतपणे अभ्यास दौरा करावा.जेणे करून त्यांच्या महानगरपालिका त्यांच्या नागरिकांना चांगल्या दर्जेदार नागरी सेवा देऊ शकतील.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**
**mahadeogolvaskar@gmail.com**

# दुष्काळसदृश्य परिस्थिती

जून महिना संपत आला तरी वरुण राजाने हजेरी न लावल्याने राज्यात दुष्काळाची दाहकता जाणवत आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीही मान्सून वेळेत दाखल झाला असला तरी मान्सूनने अद्याप गती पकडली नाही. तळकोकणात पोहचलेला मान्सून राज्याच्या अंतर्गत भागात अजूनही पोहचला नाही. १५ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र व्यापनारा मान्सून जून महिना संपत आला तरी सर्वदूर पोहचला नाही. मान्सून रेंगाळल्याने खरिपाच्या पेरण्या तर रखडल्याच आहेत शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील उभा राहिला आहे. मान्सून रखडल्याने राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट उभे राहिले आहे. राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्किल झाले आहे. धरणातील पाणी साठा कमी झाला आहे. अनेक गावातील पाण्याची पातळी खालावली आहे. मराठवाड्यातील काही गावात तर पाण्याची पातळी तीन ते चार मीटरने खालावली आहे. विहिरी, तलाव, नद्यांनी तर केंव्हाच तळ गाठला आहे. एक हंडा पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपिट करावी लागत आहे. राज्य सरकारने राबवलेल्या जलयुक्त शिवार योजनेमुळे काही गावांना दिलासा मिळाला असला तरी टँकरमुक्त महाराष्ट्र हे राज्य सरकारचे स्वप्न अद्याप साकार झाल्याचे दिसत नाही. आजही राज्यात शेकडो टँकर चालू आहेत. राज्यातील काही लाख नगरीकांवर पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. एकूणच राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळासदृश्य परिस्थितीमुळे शेतिउद्योग धोक्यात आला आहे. पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळलेले पशुधन टिकवण्यासाठी शेतकऱ्यांना चारा छावणीकडे धाव घ्यावी लागत आहे. एकूणच पावसाने ओढ दिल्याने शेती उद्योगच धोक्यात आला आहे. पाण्याअभावी ग्रामीण भागातील नागरिक स्थलांतर करू लागले आहेत. पाणी नसल्याने उपवर मुला मुलींचे विवाह रखडले आहेत. एकूणच पाऊस नसल्याने राज्याची दैन्यावस्था झाली आहे. यावर्षी वेळेत पाऊस सुरू न झाल्याने आणि राज्यावर अल निनोचे संकट असल्याने राज्य भीषण दुष्काळाच्या छायेत आले आहे. सर्वाधिक जलसिंचन आणि धरणे महाराष्ट्रात असूनही महाराष्ट्राला नेहमीच अशा दुष्काळसदृश्य परिस्थितीला किंवा दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. ही जरी नैसर्गिक आपत्ती असली तरी याला आपणच जबाबदार आहोत. उपलब्ध पाण्याचा कसाही वापर करणं, पाणी वापराचं नियोजन नसणे, पावसाचे पाणी साठवण्यासाठी सहकार्य व नियोजनाचा अभाव, शेतकरी, व्यापारी, उद्योगपती, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांनी पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीची उपाययोजना न करणे, पाणी गळती, गरजेपेक्षा अधिक पाण्याचा वापर, बेसुमार वाळू उपसा यामुळे राज्य पाण्याची तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. झाडे तोड, जंगल तोड यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे त्यामुळे ऋतुचक्रही बदलत आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले आहे. जगातील सर्वाधिक उष्ण शहरात महाराष्ट्रातील शहरांचा समावेश होऊ लागला आहे. चुकीच्या पीक पद्धतीमुळे जमिनीचा पोत कमी होऊ लागला आहे. लोकसंख्या जरी वाढत चालली तरी पाण्याचे साठे मर्यादित आहेत. त्यामुळे पाण्याची टंचाई कायम जाणवत राहणार आहे. पाण्याचा वापर, पाणी साठवणं, पाणी जिरवणं आणि पाण्याचे पुनर्भरण करणे याबाबत आपण आज जर आपण सावध झालो नाही तर भविष्यात खूप मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल. एव्हढं निश्चित की इस्राएल सारखा छोटा देश पावसाच्या अत्यल्प पाण्याचे नियोजन करुन समृद्ध होऊ शकतो तर आपण का नाही ? इस्राएलपेक्षा भारतात खूप जास्त पाऊस पडतो. या पावसाच्या पाण्याचे संचय हा दुष्काळावर उपाय ठरू शकतो. त्यासाठी जलसंधारणाच्या योजना आखणे व त्या पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. पावसाच्या पाण्याचा थेंबही वाया जाऊ न देता ते पाणी वाचवायला हवे. त्यासाठी रेन हार्वेस्टिंग सिस्टिमचा वापर करायला हवा. केवळ मोठ्या इमारतीतच नव्हे तर लहान घरातही विशिष्ट तंत्र वापरून पाणी साठवता येऊ शकते. सरकारी कार्यालये, अस्थापने, बँका, सहकारी गृहनिर्माण सोसायट्या, शाळा, महाविद्यालये यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करायला हवे.

वाढती वृक्षतोड थांबवून जास्तीतजास्त वृक्ष लागवड करायला हवी. लावलेले वृक्ष जगवायला हवेत. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला एक वृक्ष देऊन त्याची वाढ करायला सांगावी. यासाठी हवे तर विद्यार्थ्याला अतिरिक्त गुण देण्यात यावे. चुकीच्या पीकपद्धती बदलायला हव्यात. ऊस, केळी यासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना ठिबक सिंचन सक्तीचे करायला हवे. श्रमदानातून जलसंधारणाचे कामे करून जनतेचे प्रबोधन करायला हवे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालायला हवा. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीला आपणच जबाबदार असल्याने तिच्यावर मात करण्यासाठी सर्वांनी हातात हात घालून काम करायला हवे. दुष्काळ निवारण ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती आपल्या सर्वांचीच आहे

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# यशवाडी दुर्घटनेतील मृताच्या कुटुंबीयांचे आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडून सांत्वन



**मंठा - प्रतिनिधी**

यशवाडी त्रिमूखी हनुमान मंदिर येथे झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या संतोष सर्जेराव गडदे (रा. गडदे पांगरा, ता. मंठा) यांच्या पांगरा गडदे येथील निवासस्थानी आमदार बबनराव लोणीकर यांनी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. दुर्घटनेत संतोष गडदे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार लोणीकर यांनी गडदे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला. तसेच या कठीण प्रसंगी शासनाच्या विविध योजनांमधून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनीही दिवंगत संतोष गडदे यांना श्रद्धांजली अर्पण केली. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसर हळहळ व्यक्त करीत असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आमदार लोणीकर यांनी दिवंगत संतोष गडदे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली व कुटुंबीयांना धीर देत या दुःखद प्रसंगात आपण त्यांच्या पाठीशी असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी भाजपा मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, विठ्ठलमामा काळे, प्रसादराव गडदे, पंजाबराव पुणेकर, प्रकाशराव गडदे दत्तराव गडदे नरहरी गडदे रविचंद्र देवकते समाधान गडदे दिलीप गडदे पंढरीनाथ गडदे यांच्यासह गावातील शेकडो प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती.

# अल निनोच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तातडीने कार्यान्वित करा

## डॉ. संजय लाखेपाटील यांची राज्य सरकारकडे मागणी : अधिवेशनात दुष्काळ, पर्जन्यमानातील तूट, शेतकरी मदत, पीकविमा आणि आपत्ती व्यवस्थापन यावर किमान तीन दिवस विशेष चर्चा घेण्यात यावी

**जालना -प्रतिनिधी**

यंदा अल निनोच्या प्रभावामुळे राज्यात कमी पर्जन्यमानाची शक्यता वर्तविण्यात येत असताना राज्य सरकारने अधिक विलंब न करता राज्य, जिल्हा, तालुका, मंडळ आणि ग्रामस्तरावरील दुष्काळ आपत्ती व्यवस्थापन आराखडे तातडीने तयार करून कार्यान्वित करावेत, तसेच होऊ घातलेल्या अधिवेशनात हा मुद्दा मांडून याविषयी उपाययोजना कराव्यात अशी आग्रही मागणी शिवसेना सचिव तथा महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे माजी तज्ज्ञ सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली आहे. डॉ. लाखेपाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना निवेदन व ई-मेलद्वारे ही मागणी केली असून यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेऊनही त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.

भारतीय हवामान विभाग, स्कायमेट तसेच विविध आंतरराष्ट्रीय हवामान संशोधन संस्थांनी अल निनो सक्रिय झाल्याचे संकेत दिले असून यामुळे

चालू वर्षात ४२ ते ६२ % पाऊसमान कमी पडण्याचे शास्त्रीय अंदाज व्यक्त केले आहेत आणि जवळपास सगळा जून महिना कोरडा गेला पावसाचा मोठा खंड पडला आहे. मान्सूनचा वेग मंदावल्याने भविष्यात गंभीर



दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी नमूद केले आहे. राज्य सरकारने प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दुष्काळ देखरेख समित्या तातडीने कार्यान्वित कराव्यात आणि दुष्काळ व्यवस्थापन मार्गदर्शिका-२०२० नुसार कामकाज सुरू करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार केंद्र सरकारने लागू केलेल्या 'मॅन्युअल फॉर ड्रॉट मॅनेजमेंट' या वैधानिक प्रणालीचे पालन करणे राज्य सरकारसाठी बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळ निर्धारणासाठी पूव वापरली जाणारी 'ट्रिगर' प्रणाली प्रभावीपणे राबविली जात नसल्याचे दिसून येत असल्याचा दावा करत त्यांनी यामुळे वेळेवर दुष्काळ जाहीर करणे, केंद्राची मदत मिळविणे आणि पीकविमा दाव्यांचे योग्य निर्धारण करणे कठीण होत असल्याचे सांगितले. परिणामी शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. गेल्या काही वर्षांत अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत असल्याचा उल्लेख करत डॉ. लाखेपाटील यांनी 'ग्रीन ड्रॉट' अर्थात 'हिरवा दुष्काळ' या संकल्पनेचा विचार करण्याची गरज व्यक्त केली. कर्नाटक आणि गुजरातसारख्या राज्यांनी अतिवृष्टीमुळे होणाऱ्या नुकसानासाठी स्वतंत्र निकष तयार केले आहेत. महाराष्ट्रातही अशा परिस्थितीसाठी स्पष्ट धोरण आणि निकष जाहीर करावेत, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात मदत व पुनर्वसन विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग हे दोन वेगवेगळ्या मंत्र्यांकडे असल्याने निर्णय प्रक्रियेत विलंब होत असल्याचा मुद्दा *(पान २ वर)*

# सिद्धार्थ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार तसेच प्राचार्या डॉ. सविता सिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद येथे आज रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दिलेल्या सूचनांनुसार सर्व महाविद्यालयांनी एकाच वेळी योग कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार महाविद्यालयात कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. सुनील मेढे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांचा समावेश होता. योग प्रात्यक्षिके घेण्याचे काम प्रा. डॉ. पी. जे. मिसाळ यांनी केले. त्यानंतर प्रा. डॉ. पी. जे. मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, अनुलोम-विलोम, कपालभाती आदी योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. विद्यापीठाच्या सूचनांनुसार सूक्ष्म हालचाली, सूर्यनमस्कार, विविध योगासने व प्राणायामाचा समावेश असलेला योगाभ्यास करण्यात आला. प्रत्येक आसनाचे महत्त्व, त्याचे शरीरावर होणारे परिणाम तसेच योग्य पद्धतीने योगाभ्यास करण्याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

या उपक्रमात प्रा. डॉ. सतीश ठोंबरे, ग्रंथपाल अशोक पठाडे, प्रा. डॉ. एस. डी. पाटील, प्रा. यू. वाय. वाघ, प्रा. एस. डी. पैठणे, प्रा. शैलीप्रकाश वाघमारे, प्रा. डॉ. एस. आर. पहारे, प्रा. डॉ. जितेंद्र वाघ, अशोक जाधव, गणेश आढावे, रवींद्र उजेड, दादाराव गायकवाड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी *(पान २ वर)*

# हुमणी अळी नियंत्रणासाठी टेंभुर्णी येथे जनजागृती व प्रात्यक्षिक मोहीम

**दत्ता देशमुख**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पिकांचे हुमणी अळीपासून संरक्षण करण्यासाठी टेंभुर्णी येथे कृषि विभागाच्या वतीने हुमणी अळी नियंत्रण व व्यवस्थापन मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत शेतकऱ्यांना हुमणी अळीची ओळख,प्रादुर्भावाची लक्षणे तसेच प्रभावी नियंत्रण उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी उपकृषी अधिकारी श्री.संतोष गिरी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राची माहिती देत, कीड नियंत्रणासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच शेतकऱ्यांनी नियमित शेत निरीक्षण करून प्रादुर्भाव दिसून आल्यास तात्काळ शिफारशीत उपाययोजना राबविण्याचे आवाहन केले.

ही मोहीम श्री.रवि खरात व श्री.विष्णू जोशी यांच्या शेतावर घेण्यात आली.कार्यक्रमादरम्यान हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या वेळी परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. त्यांनी कृषि विभागाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत हुमणी अळी नियंत्रणासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.''हुमणी अळीमुक्त शेत समृद्ध शेतकरी''हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भाजपा जालना शहर व पतंजली योग समिती च्या वतीने शहरात विविध ठिकाणी भव्य योग शिबिरांचे आयोजन

जालना (प्रतिनिधी) : भारतीय जनता पार्टी जालना महानगर व पतंजली योग समिती जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जालना शहरातील विविध ठिकाणी भव्य योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगाभ्यास केला.

या योग शिबिरांचे आयोजन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पतंजली यौव समिति जालना च्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. ज्वाला लॉन्स, गोरक्षण पांजरापोळ मैदान, जुना जालना येथील मराठा सेवा संघ कार्यालय तसेच मौजपुरी येथे योग शिबिरांचे



आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा सत्र घेण्यात आले. नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राउत, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, सरचिटणीस सुनील पवार, सभापती संध्या देठे, शिवप्रकाश चितळकर, ॲड.भगवान चांदोडे, अजित मानधानी, कल्याण भदनेकर, संजय पाखरे, सभापती पूनम स्वामी, आनंद झारखंडे, ऐश्रवर्या आडेकर, मनोज जोशी, शशिकांत घुगे, अमोल धानुरे, संजय डोंगरे, बद्रीनाथ भसांडे, राजाराम राजे जाधव, सुदर्शन काळे, अमन मित्तल आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक स्वास्थ्य चांगले राहते. आजच्या धावपळीच्या जीवनात निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीसाठी योग अत्यंत आवश्यक आहे. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे आंतरराष्ट्रीय योग दिनाला जागतिक मान्यता मिळाली असून जगभरात योगाचे महत्त्व वाढत आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा असेही त्यांनी सांगितले व या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पतंजली योग समितीचे पदाधिकारी, प्रशिक्षक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच सर्व सहभागी नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. सर्वांच्या सहकार्यामुळे हे योग शिबिर यशस्वीरीत्या पार पडल्याचे त्यांनी सांगितले.

# रिसोड येथे आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि आत्म्याला जोडणारी जीवनशैली - डॉ. ज्ञानेश्वर सदार पाटील

**रिसोड । प्रतिनिधी**

रिसोड येथील आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक, प्राणायाम तसेच योगाचे महत्त्व आणि आरोग्यदायी जीवनासाठी योगाचे फायदे याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. उपस्थितांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानसाधना



करून निरोगी जीवनाचा संकल्प केला. यावेळी योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्म्याला जोडणारी एक प्रभावी जीवनशैली असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी व तंदुरुस्त राहते, मन प्रसन्न व शांत राहते तसेच तणाव, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्यांपासून दूर राहण्यास मदत होते.

ते पुढे म्हणाले की, योगामुळे एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते तसेच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. आधुनिक जीवनशैलीत वाढणारा तणाव आणि आरोग्याच्या समस्या लक्षात घेता प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी श्यामभैया तिवारी *(पान २ वर)*

# बलात्कारासारख्या खोट्या तक्रारींना चापः उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाने एका महिलेने दाखल केलेला बलात्काराचा एफआयआर (प्रथम माहिती अहवाल) रद्द करून एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. या महिलेने यापूर्वीही महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये विविध पुरुषांविरुद्ध बलात्कार, घरगुती हिंसाचार आणि क्रूरतेच्या एकूण १० खोट्या तक्रारी दाखल केल्या होत्या. मा. न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या एकलपीठाने या महिलेची सहमतीने शारीरिक संबंध ठेवण्याची आणि नंतर बलात्काराचे खोटे आरोप करण्याची सवयीची कार्यप्रणाली (मोडस ऑपरेंडी) लक्षात घेऊन हा निर्णय दिला. या प्रकरणात, मनोज बाळासाहेब धनवडे यांच्याविरुद्ध जून २०१९ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (बलात्कार), कलम ३५४ (महिलेचा विनयभंग) आणि कलम ३५४अ (लैंगिक छळ) अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला होता. धनवडे यांनी हा एफआयआर रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने सर्व १० एफआयआरचे वाचन केल्यानंतर असे स्पष्ट केले की, धनवडे यांच्याविरुद्ध दाखल केलेला एफआयआर हा याचिकाकर्त्याला त्रास देण्यासाठी केलेला एक अप्रामाणिक आणि दुर्भावनापूर्ण प्रयत्न आहे. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, तक्रारदार महिला ३४ वर्षांची असून ती नोकरी करणारी आणि मोठ्या प्रमाणावर प्रवास करणारी आहे. ती स्वतः विवाहित असून तिचे याचिकाकर्त्यासोबत आणि इतर पुरुषांसोबतही संबंध होते. तिचे वर्तन तिचे संपूर्ण प्रकरण संशयास्पद आणि असत्य बनवते. धनवडे यांच्यासोबतचे संबंध हे सहमतीने होते आणि गुणवत्तेच्या आधारावरही त्यांच्याविरुद्ध कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही, असे न्यायालयाने नमूद केले. : ५

या महत्त्वपूर्ण निकालामध्ये, उच्च न्यायालयाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना (डीजीपी) या तक्रारदार महिलेचे तपशील राज्यातील सर्व *(पान २ वर)*

# जाफ्राबाद तालुक्यात झेडपी शाळा ओस, शिक्षणासाठी शाळा समितीच्या बैठकीत डिजिटल शिक्षणाचा निर्णय

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची परिस्थिती सध्या अत्यंत चिंताजनक बनली आहे. एकीकडे शाळेत शिक्षकांची संख्या पुरेशी असली, तरी विद्यार्थ्यांची पटसंख्या मात्र वेगाने घटत आहे. प्रशासनाची अनास्था, राजकीय वरदहस्ताने फोफावलेल्या खाजगी इंग्रजी शाळा आणि पालकांची उदासीनता यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेचा खेळखंडोबा झाला आहे.

खाजगी इंग्रजी शाळांनी पाचवीच्या प्रवेशासाठी आक्रमक मोहीम राबवत झेडपी शाळेतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मोफत गणवेश आणि बससेवेची आमिषे दाखवून आपल्याकडे खेचण्याचा सपाटा लावला आहे. यात शिक्षण हक्क कायद्याचे उघडपणे उल्लंघन होत असले तरी प्रशासनाने सोयीस्कर डोळेझाक केली आहे. पूर्वीच्या काळी विद्यार्थी होते पण बसायला वर्गखोल्या नव्हत्या, आता मात्र सुसज्ज इमारती आणि शिक्षक असूनही विद्यार्थी नाहीत, अशी विदारक स्थिती आहे. याला जबाबदार कोण, याचे आत्मचिंतन शिक्षण विभागाने करण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे, राजकीय छत्रछायेखाली गल्लीबोळात खाजगी शाळांचे पेव फुटले असून, शिक्षण अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी

यावर कारवाई करण्याऐवजी आपली जबाबदारी झटकत आहेत. फुकट म्हणजे निकृष्ट असा गैरसमज करून घेतलेले पालकही स्वतः झेडपी शाळेत शिकून मोठे झालेले असतानाही, आपल्या पाल्यांना भरभक्कम फी देऊन खाजगी शाळेत पाठवण्यास प्राधान्य देत आहेत.

### सर्वांनी एकत्र येण्याची गरज

''झेडपी शाळा बंद पडली तर गावाचे भविष्य अंधारात जाईल. आता तरी प्रशासन, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन झेडपी शाळा वाचवली पाहिजे. शिक्षकांनी दर्जा वाढवला तरच स्पर्धेत टिकण्याची क्षमता निर्माण होईल.''

- रेखा जमधडे, सदस्य, शालेय समिति

याच पार्श्वभूमीवर २० जून रोजी टेंभुर्णी येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शाळेतील विद्यार्थ्यांची घटती संख्या हा या बैठकीतील मुख्य चर्चेचा विषय होता. यावर उपाय म्हणून प्रत्येक वर्गखोलीत टीव्ही संच बसवून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण देण्यासाठी सर्वानुमते पुढाकार घेण्यात आला. शिक्षकांनी आपल्या शिकवण्याचा दर्जा उंचावावा आणि पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करावा, यासाठी समितीच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याची हमी देण्यात आली. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रशांत शिंदे, गौतम चंदनशिवे, रावसाहेब अंभोरे, रेखा जमधडे, प्रणिती आव्हाळे, दशरथ खरात, कुरेशी मॅडम, सतीश खरात, **मंगलाताई साने, अशोक हरकळ आणि आनंदा माने यांची उपस्थिती होती.**

### विशेष लक्ष देणे गरजेचे

''खाजगी शैक्षणिक संस्था स्पर्धेत बलाढ्य आहेत, त्यामुळे झेडपी शाळेत गोरगरिबांची मुले शिकतात. जिल्हा परिषद शाळेतील आळशी प्रवृत्ती बाजूला सारून शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष द्यावे.''

**- गौतम चंदनशिवे, सदस्य, शालेय समिती**

तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये तीन शिक्षक कार्यरत असतानाही पटसंख्या अवघ्या १५ ते २० वर येऊन ठेपली आहे. शासनाचा दरमहा लाखो रुपयांचा निधी शिक्षकांच्या पगारावर खर्च होत असूनही शाळांचे वर्ग मात्र रिकामेच दिसत आहेत. शासनाने आणि शिक्षण भागाने याकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.